फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८६/२०२२

**निशाणी क्र.१० पुढे**

**अर्जदार नामे जिजाबाई छगन आखाडे हिचा उलटतपास सामनेवाल्यातर्फे ॲड. टि.बी. ढोकणे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१. मी सलाबतपूरला लग्न झाल्यापासून राहत आहे. हे म्हणणे खरे आहे कि तेथे मला शासनाकडून घरकूल मिळाले आहे. माझे रेशनकार्ड स्वतंत्र आहे. हे म्हणणे खरे आहे कि, रेशनकार्डवर मला तांदुळ, गहू असे धान्य मिळते. हे म्हणणे खरे आहे कि, माझे बॅक ऑफ बडोदा मध्ये खाते आहे. हे म्हणणे खरे आहे कि, मला सरकारकडून जी मदत मिळते ती त्या खात्यात जमा होते. मला तिन महिण्ययाला दिड हजार रुपये मिळतात. हे म्हणणे खरे नाही कि, सलाबतपूर येथील जमीनी बागायती आहेत. हे म्हणणे खरे आहे कि, त्या भागात रोजाने कामाला जाणा–या महिलांना तिनशे रुपये मिळतात. हे म्हणणे खरे नाही कि, मी शेती कामाला जाते व मला दररोज तिनशे रुपये मिळतात.

२. माझ्या आजारपणाबाबत माझ्याकडे लेखी कागदपत्रे आहेत. ते मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही कि, मला कोणताही आजार नाही. हे म्हणणे खरे नाही कि, मी हिंडू फिरु शकते, काम करु शकते.

३. माझ्या वडिलांच्या नावे ६ एकर जमीन होती. हे म्हणणे खरे नाही कि, मी व माझे भाऊ वारस लागले. हे म्हणणे खरे नाही कि, वडीलांच्या शेतातील उत्पन्न मी घेते. सामनेवाला याचे वय ७६ ते ७७ वर्ष झालेले आहे हे मला सांगता येणार नाही. हे मला माहित नाही कि, सामनेवाला नेहमी आजारी असतो, त्याला मणक्याचा, गुडघ्याचा व कमरेचा, मधूमेहाचा आजार आहे. हे मी सांगू शकत नाही कि त्यामुळे सामनेवाला यास कामधंदा करता येत नाही.

हे मला सांगता येत नाही कि, सामनेवाला यास केवळ १३ गुंढे शेती आहे. हे मला सांगता येत नाही कि, ती जमीन जीरायती असल्यामूळे त्यातून काही उत्पन्न मिळत नाही. हे मला माहीत नाही कि, पाच वर्षापूर्वी सामनेवाला याचा मोटारसायकलवरून अपघात झाला व त्यामध्ये त्याचा हात मोडला. हे मला सांगता येत नाही कि, त्यामुळे त्याला हाताने कोणताही कामधंदा करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही कि, सामनेवाला यास दुस–यावर अवलंबून रहावे लागते. हे म्हणणे खरे नाही कि, सन २०१६ व २०१७ मध्ये त्याच्या डोळयांचे ऑपरेशन झाले. हे मला माहित नाही कि, त्यामुळे त्याला डोळयाने कमी दिसते व कमी ऐकू येते. हे म्हणणे खरे नाही कि, त्यामुळे त्याला औषधोपचाराकरिता खर्च येतो व तो दुस–यांकडून घ्यावे लागते. हे म्हणणे खरे नाही कि, त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने तो स्वःताची उपजिविका करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे कि, सामनेवाला मला पुर्वी झालेल्या पोटगीची रक्कम भरत नाही.

४. हे मला माहित नाही कि, सामनेवाला उपाशी राहून थोडीफार रक्कम भरतो. हे मला माहित नाही कि, त्याला डॉक्टरांनी गुडध्याचे ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला आहे. परंतू तो पैसे नसल्याने ऑपरेशन करु शकत नाही. हे मला माहित नाही कि, शारिरीक त्रासामुळे त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. हे म्हणणे खरे नाही कि, सामनेवाला याच्या पेक्षा माझी परिस्थीती चांगली असल्याने मला पोटगीची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या सरतपासातील कलम २ ते ५ मधील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही कि, सामनेवाला यास बागायती शेती असून त्याला उत्पन्न मिळते हे मी खोटे सांगत आहे. हे

म्हणणे खरे नाही कि, सामनेवाला यास त्रास देण्यासाठी खोटा अर्ज केला असून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**
**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–१७/०३/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा